University of Mumbai

# मुंबई विद्यापीठ
## ई-मासिक वार्तापत्र



एप्रिल २०२४
वर्ष - ०३ • अंक ०४

**नॅक द्वारा पुनर्मूल्यांकनामध्ये ३.६५ सीजीपीए सहित अ ++ श्रेणी**
**विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा**

# यूकेमधील प्रतिष्ठित विद्यापीठांसोबत शैक्षणिक सामंजस्यासाठी मुंबई विद्यापीठाचा पुढाकार

## दुहेरी पदवी, सह पदवीसह संशोधनाच्या क्षेत्रात संधींचे नवे दालन होणार खुले

## लंडन विद्यापीठ, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स, एसओएएस शापूरजी पालनजी इन्स्टिट्यूट ऑफ झोरोस्ट्रियन स्टडीज, ऑक्सफोर्ड विद्यापीठ आणि कॅम्ब्रिज विद्यापीठांशी चर्चा



**लंडन विद्यापीठातील प्र- कुलगुरू प्रा. मेरी स्टियास्नी यांच्या समवेत मुंबई विद्यापीठाचे शिष्टमंडळ**

मुंबई, दि. १९ एप्रिलः उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने वाटचाल करताना मुंबई विद्यापीठाने आघाडी घेत युकेमधील प्रतिष्ठित विद्यापीठांशी शैक्षणिक सामंजस्य करार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यामध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, एसओएएस युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, एसओएएस शापूरजी पालनजी इन्स्टिट्यूट ऑफ झोरोस्ट्रियन स्टडीज, ऑक्सफोर्ड विद्यापीठ आणि कॅम्ब्रिज विद्यापीठ अशा प्रतिष्ठित विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संस्थांचा समावेश आहे. नुकत्याच मुंबई विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या वतीने कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साहचर्य व विद्यार्थी सहाय्य केंद्राचे समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी या विद्यापीठांना भेटी देऊन तेथील प्रतिनिधींशी उच्च शिक्षणातील विविध संधींवर चर्चा करून शैक्षणिक सामंजस्य करार करण्यासाठी स्वारस्य दाखवले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अनुभवात्मक आणि कौशल्य प्रशिक्षण, श्रेणी हस्तांतरण, दुहेरी पदवी, सह पदवी, ऑनलाईन आणि प्रत्यक्ष इंटर्नशिप, विद्यार्थी-शिक्षक आदान –प्रदान विविध शैक्षणिक कार्यक्रम, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन, सह सांस्कृतिक कार्ये आणि शैक्षणिक साहित्य-संसाधन निर्मिती व हस्तांतरण अशा विविध क्षेत्रातील संधीचे दालन खुले व्हावे यासाठी या विद्यापीठांबरोबर करार केले जाणार आहेत. उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दृष्टिकोनातूनही या करारांचे महत्व अधोरेखित होणार आहे.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स संस्थेसोबत मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी विभागाशी शैक्षणिक सामंजस्याअंतर्गत सह पदवी, संयुक्त संशोधन प्रकल्प आणि विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. एसओएएस शापूरजी पालनजी इन्स्टिट्यूट ऑफ झोरोस्ट्रियन स्टडीज या संस्थेसोबत मुंबई



एसओएएस युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथील कुलगुरू प्रा. आदम हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा करताना मुंबई विद्यापीठाचे शिष्टमंडळ



एसओएएस युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथील कुलगुरू प्रा. आदम हबीब यांच्याशी सामंजस्य कराराबाबत चर्चा करताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी

विद्यापीठाच्या अवेस्ता पहलवी केंद्राच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम, ट्विनींग प्रोग्राम, परिसंवाद, कार्यशाळा आणि संयुक्त संशोधन प्रकल्पासाठी शैक्षणिक सामंजस्य करण्यात येणार आहे. संयुक्त ऑनलाईन पदवी, संयुक्त संशोधन प्रकल्प, मूक्स आणि शैक्षणिक साहित्य-संसाधन निर्मिती व हस्तांतरण सुरु करण्यासाठी लंडन विद्यापीठ, लंडन, यूके येथील विद्यापीठाशी करार करण्यात येणार आहे. मानव्यविज्ञान, भाषा आणि आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अध्ययन क्षेत्रातील सह ऑनलाईन पदवी प्रोग्राम, ट्विनींग प्रोग्राम आणि इंटर्नशिपसाठी एसओएएस युनिव्हर्सिटी ऑफ लंडन यांच्याशी करार केला जाणार आहे. त्याच बरोबर सोमरविले कॉलेज ऑक्सफोर्ड विद्यापीठ आणि कॅम्ब्रिज विद्यापीठ यांच्यासोबतही उच्च शिक्षणातील विविध उपक्रम आणि संधींबाबत सामंजस्य करण्यासाठी प्राथमिक स्वरुपातील चर्चा करण्यात आली.

मुंबई विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या वतीने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथील कुलगुरू प्रा. लॅरी क्रॅमर, एसओएएस शापूरजी पालनजी इन्स्टिट्यूट ऑफ झोरोस्ट्रियन स्टडीज येथील प्रा. अल्मुट हिंटझे, लंडन विद्यापीठातील प्र- कुलगुरू प्रा. मेरी स्टियास्नी, एसओएएस युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथील कुलगुरू प्रा. आदम हबीब,



लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्सचे कुलगुरू प्रा. लॅरी क्रेमर यांच्याशी शैक्षणिक सामंजस्यासाठी चर्चा करताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनील पाटील



एसओएएस शापूरजी पालनजी इन्स्टिट्यूट ऑफ झोरोस्ट्रियन स्टडीज येथील प्रा. अल्मुट हिंटझे यांच्यासोबत मुंबई विद्यापीठाचे शिष्टमंडळ

सोमरविले कॉलेज ऑक्सफोर्ड विद्यापीठ येथील नीरज शेट्ये आणि कॅम्ब्रिज विद्यापीठ येथील प्रा. रोझलिंड ओ हॅनलॉन यांच्याशी भेट घेऊन शैक्षणिक सामंजस्यासाठी चर्चा करण्यात आली.

> "राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील प्रगत ज्ञानशाखात सखोल अध्ययन व संशोधन व्हावे यासाठी मुंबई विद्यापीठाने हे महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वैश्विक ज्ञानाच्या देवाणघेवाण प्रक्रियेमुळे विविध देशांतील शिक्षण प्रणालींमध्ये विकसित होत असलेल्या परस्परसंवादाद्वारे विद्यार्थ्यांना या कराराअंतर्गत फायदा होणार असून, यामुळे सर्वोत्कृष्ट शैक्षणिक आणि संशोधन पद्धतींच्या सामायिकरणास प्रोत्साहन मिळू शकेल."
>
> **- प्रा. रवींद्र कुलकर्णी,** कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

## लंडन येथे पार पडली 'शाश्वतता, सर्वसमावेशक विकास आणि डॉ. बी. आर. आंबेडकर' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद
## लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या संग्रहालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'द प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' डी. एस्सी प्रबंधासह दुर्मिळ लेख आणि दस्तऐवजांचे प्रदर्शन
## लंडन येथील भारतीय उच्चायुक्तातर्फे भारत भवन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन
## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे सादर केलेल्या डी.एस्सी प्रबंधाचा शताब्दी सोहळा

मुंबई, दि. १५ एप्रिलः भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे १९२३ ला सादर केलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' या डी.एस्सी प्रबंधाच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने लंडन येथे 'शाश्वतता, सर्वसमावेशक विकास आणि डॉ. बी. आर. आंबेडकर' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, बार्टीचे महासंचालक श्री. सुनिल वारे, लंडन स्थित अभ्यासक आणि अनिवासी

भारतीय श्री. गंगावणे, लॅरी क्रामेर, अध्यक्ष आणि कुलगुरू लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लॉर्ड निकोलस स्टर्न, आयजी पटेल प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स अँड गव्हर्नमेंट अँड को-चेअर इंडिया, डॉ. रुथ कुट्टुमुरी, को-चेअर इंडिया ऑब्झर्वेटरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ. मनिषा करणे, सुजीत घोष, उपउच्चआयुक्त, भारतीय उच्चआयुक्तालय, डॉ. शंतनू सिंह, संशोधक, इंडिया ऑब्जर्वेटरी, डॉ. सुप्रिया कामथ, डॉ. नियथी कृष्णा, श्रीमती एलिजाबेथ रायन आणि मानस गोयल यांच्यासह विविध मान्यवर आणि लंडन आणि भारतातून ६४ संशोधक उपस्थित होते. १३ आणि १४ एप्रिल २०२४ या दोन दिवस चाललेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'शाश्वतता, सर्वसमावेशक विकास आणि डॉ. बी. आर. आंबेडकर' या विषयाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदान, प्रघाड ज्ञान आणि समकालीन संशोधन आणि आर्थिक धोरणांशी त्यांची प्रासंगिकता यावर शंशोधक आणि धोरणकर्त्यांना या परिषेदेच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.

### ❖ विविध विषयांवर सादरीकरण

दोन दिवस चाललेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'आंबेडकर्स कॉन्ट्रीब्युशन्स टू इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म', 'कास्ट अँड सोशल जस्टीस', 'इंटरसेक्शनल इनइक्वॅलीटीज्', 'आंबेडकर्स व्हिजन ऑन एज्युकेशन, लिटरेचर अँड कल्चर' अशा चार सत्रात विविध संशोधकांनी त्यांच्या विषयांचे सादरीकरण केले. यामध्ये प्रामुख्याने 'डॉ. बी. आर. आंबेडकर नॉनकन्फर्मिस्ट इकॉनॉमिस्ट', 'द इकॉनॉमिक्स ऑफ कास्ट सिस्टीम', 'रेलेव्हंस ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर्स मॉडेल ऑफ नॅशनलायझेशन ऑफ एग्रीकल्चर लँड', 'द रोल ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन सस्टेनॅबल अँड इन्क्ल्युझिव्ह डेव्हलपमेंट ऑफ इंडिया', 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरः आर्किटेक्ट ऑफ इंडियन कान्स्टीट्यूशन', 'रोल ऑफ डॉ. भीमराव आंबेडकर इन सस्टेनिंग सोशल जस्टीस इन इंडिया', 'अंडरस्टँडींग आंबेडकर बीयॉण्ड रिझर्वेशन', 'फॉरगॉटन हिस्ट्रीज ऑफ रॅसिलाईज कलोनिअल नेटवर्क्स ऑफ डोमेस्टिक वर्कर्स इन साऊथ इंडिया', 'इंडियन वुमेन एट क्रॉसरोड्स', 'डॉ. बी. आर. आंबेडकरः अ



लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेले मान्यवर




लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेले मान्यवर

फेमिनिस्ट वॅनगार्ड इन द फाईट फॉर वुमेन्स इमॅनिसीपॅशन', 'इंटरसॅक्टींग आयडेंटीज्', 'रोल ऑफ डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन वॉटर मॅनेजमेंट पॉलिसी', 'डॉ. आंबेडकर्स व्हिजन अँड रेजिलेंस ऑफ दलित लिटरेचर अँड कल्चरल ट्रान्सफॉर्मेशन', 'रिडींग, रिरीडींग अँड अंडरस्टँडींग आंबेडकर्स लिटररी आर्किटेक्टॉनिक्स इन द टाईम्स ऑफ म्यूटंट डेमोक्रसी', 'डॉ. आंबेडकर्स इंटरसेक्शनल नरेटिव्ह ऑन लँग्वेज, लिटरेचर अँड कल्चर' अशा विषयावर संशोधक आणि प्राध्यापकांनी सादरीकरण केले. परिषदेच्या समारोपीय सत्रासाठी माल्दोवाच्या माजी पंतप्रधान नतालिया गॅव्रिलिटा, लॉर्ड मेघनाथ देसाई, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, इंडो ब्रिटीश ऑल पार्टी पार्लियामेंटरी ग्रुप चेअरचे विरेंद्र शर्मा यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

### ❖ लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे ऐतिहासिक दस्तऐवजांचे प्रदर्शन

विशेष म्हणजे या परिषदेच्या दरम्यान लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या संग्रहालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'द प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' या डी.एस्सी प्रबंधासह बाबासाहेबांची दुर्मिळ पत्रे, लेख आणि दस्तऐवजांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. जुने ऐतिहासिक दस्तऐवज संग्रह वाचकांसाठी, अभ्यासकांसाठी आणि संशोधकांसाठी विशेष प्रयत्न करून दोन दिवसासाठी सर्वांसाठी खुले करण्यात आले होते. या ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' या प्रबंधाची मूळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हस्तलिखित पत्र, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये विद्यार्थी दशेत असताना डॉ. आंबेडकर यांची उपस्थिती पत्र, हजेरीपट त्याचबरोबर भारतातून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अभ्यासासाठी येणारे भारतीय विद्यार्थी यांना आवश्यक असणारी मदत करण्यासाठी व त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भारतातून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला पत्र पाठवून या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी केलेला पत्रव्यवहार हे सर्व जुने आणि दूर्मिळ दस्तऐवज प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.




लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या संग्रहालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'द प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' या डी.एस्सी प्रबंधाची मूळ प्रत



लंडन येथील भारतीय उच्चायुक्तातर्फे 'भारत भवन' येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची क्षणचित्रे



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू
प्रा. रवींद्र कुलकर्णी उपस्थितांशी संवाद साधताना



लंडन येथील भारतीय उच्चायुक्तातर्फे 'भारत भवन' येथे
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या
जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची क्षणचित्रे

## लंडन येथील भारतीय उच्चायुक्तातर्फे 'भारत भवन' येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन

लंडन येथील भारतीय उच्चायुक्तातर्फे 'भारत भवन' येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असून मुंबई विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या माध्यमातून अध्ययन आणि संशोधनाचे महत्वपूर्ण कार्य हाती घेण्यात आले असल्याचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच अंबाडवे, मंडणगड येथील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांचाही आढावा घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टिकोनातून साकारलेल्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्मितीवरही त्यांनी प्रकाश टाकला. या जयंती अभिवादनाच्या कार्यक्रमासाठी कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, बार्टीचे महासंचालक श्री. सुनिल वारे, अनिवासी भारतीय श्री. गंगावणे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. तत्पूर्वी शिष्टमंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथील घराला भेट देण्यात आली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथील निवास स्थानी
मुंबई विद्यापीठाचे शिष्टमंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक थोर शिक्षणशास्त्री- कुलगुरू डॉ. विष्णू मगरे
# मुंबई विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे

मुंबई, दि. १५ एप्रिल: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेसंबंधी मांडणी, विशेषतः उच्च शिक्षणाच्या सर्वच ज्ञानशाखात समाजहितैषि “विद्यार्थी घडवणे” या प्रणालीस निती मानून त्यानुरूप शैक्षणिक व्युवरचना करून व तीस अनुरूप अशा अध्यापन व अध्ययन पद्धतीचा अवलंब केल्यास प्रबुद्ध, प्रशिक्षित व वाकबगार विद्यार्थी निर्माण केले जावू शकतात आणि अशी सुज्ञ माणसे स्वत: बरोबरच, समाज व देशाला प्रगतीपथावर नेण्यात जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावत आपली कर्तबगारी सिद्ध करू शकतात, अशा परिवर्तनशील क्रांतिकारी विचारांची मांडणी ते मुंबई विद्यापीठातील महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच शिक्षक म्हणून तसेच विद्यापीठाच्या परीक्षांचे परिक्षक म्हणून काम करत असताना, केली आहे असे प्रतिपादन प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे यांनी केले. आजच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात समाविष्ट असलेल्या अनेक उल्लेखनीय तरतुदी बाबासाहेबांनी यापूर्वी विशद केल्या असून त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील या महत्त्वपूर्ण योगदानामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एक थोर शिक्षण शास्त्री म्हणूनची ओळख अधोरेखित होते असेही ते म्हणाले. मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ते प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांशी संवाद साधत होते. यावेळी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, प्रभारी कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, जंयती उत्सव समितीच्या निमंत्रिका प्रा. मनिषा करणे यांच्यासह विविध विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर अधिकारी-कर्मचारी, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे कुलगुरू डॉ. विष्णू डॉ. मगरे म्हणाले, बाबासाहेब आंबेडकर हे मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. एलफिन्स्टन महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण, सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापक आणि शासकीय विधी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून बाबासाहेबांनी मोठे योगदान दिले आहे. विधीच्या शाखेच्या पाच वर्षीय अभ्यासक्रमाची कल्पना व शिफारश हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टिकोनाचा महत्वपूर्ण पैलू असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. क्रांतीसूर्य महात्मा फुले यांनी सर्वसमावेशक शिक्षणासाठी केलेल्या अथक प्रयत्नांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरु प्राचार्य डॉ.अजय




संविधान गौरव यात्रेत सहभागी झालेले मान्यवर



संविधान गौरव यात्रेसाठी काढण्यात आलेले लेझिम पथक

भामरे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या विविध क्षेत्रातील योगदानावर प्रकाश टाकला, तसेच विद्यापीठातर्फे आयोजित केलेल्या क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सप्ताहाच्या वतीने आठवडाभर राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. जयंती सप्ताहाच्या निमंत्रिका प्रा. मनिषा करणे यांनी जयंती सप्ताहाच्या अहवालाचे वाचन केले. जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित संविधान गौरव यात्रेसाठी शारीरिक शिक्षण विभागाच्या लेझिम पथकांने अनेकांचे लक्ष वेधले.

---

## महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील पुस्तके आणि दुर्मिळ ग्रंथ साहित्यांचे प्रदर्शन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दुर्मिळ पत्रे, लेख व दस्तऐवजांचे डिजीटायजेशन

## मुंबई विद्यापीठात महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सप्ताहाला सुरुवात

मुंबई, दि. ०८ एप्रिलः १५० हून अधिक पुस्तके, दुर्मिळ लेख, साहित्य, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा, रविवार ३ एप्रिल १९२७ चा बहिस्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक, मुकनायक, जनता साप्ताहिकाचे ऑक्टोबर १९५६ चे हिरक महोत्सवी विशेषांक, २७ ऑक्टोबर १९५६ चा प्रबुद्ध भारतचा अंक, १३ मे १९२० चे शिक्षण आयोगाचे ए. बी. क्लार्कचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उद्देश्यून लिहलेले पत्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड, आंबेडकर ऑन पॉप्युलेशन पॉलिसी, चॅम्पीयन ऑफ ह्युमन राईट्स, द आंबेडकर एरा, महात्मा फुले गौरवग्रंथ, शोधाच्या नव्या वाटा, गुलामी, नवे पर्व, महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेली विविध पत्रे, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन ग्रंथालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ओळखपत्र, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथील ११



क्रांतीसूर्य जोतिराव फुले आणि
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित
पुस्तके आणि दुर्मिळ ग्रंथ साहित्यांचे प्रदर्शनाची क्षणचित्रे



क्रांतीसूर्य जोतिराव फुले आणि
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित
पुस्तके आणि दुर्मिळ ग्रंथ साहित्यांचे प्रदर्शनाची क्षणचित्रे

ऑक्टोबर १९१६ मधील विद्यार्थी पास, ५ जानेवारी १९३१ ला लंडनहून बडोदा येथील महाराजांना लिहीलेले पत्र, वसंत व्याख्यानमालेच्या निमंत्रणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चिटणीस यांनी लिहलेले १५ एप्रिल १९२७ रोजीचे पत्र, कोलंबिया विद्यापीठाचे २५ ऑक्टोबर १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उद्देशून लिहलेले पत्र, राजगृह दादर येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शंकरदास बर्वे यांना ३० सप्टेंबर १९३६ ला लिहलेले पत्र, समता या पाक्षिकाचा २९ जून १९२८ चा पहिला अंक, त्याचबरोबर भारतीय संविधानाच्या मसुद्याची प्रत अशा विविध ग्रंथांबरोबर दुर्मिळ पत्रे, लेख आणि दस्तऐवजांचा खजिना आज मुंबई विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू ज्ञान स्रोत केंद्राच्या नवीन इमारतीत खूला करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ही सर्व दुर्मिळ पत्रे, लेख आणि दस्तऐवजांचे जतन व संवर्धन करून डिजिटाईज करण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठामध्ये ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२४ या दरम्यान महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सप्ताहाचे आयोजन



क्रांतीसूर्य जोतिराव फुले आणि
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित
पुस्तके आणि दुर्मिळ ग्रंथ साहित्यांचे प्रदर्शनाची क्षणचित्रे



क्रांतीसूर्य जोतिराव फुले आणि
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित
पुस्तके आणि दुर्मिळ ग्रंथ साहित्यांचे प्रदर्शनाची क्षणचित्रे



**क्रांतीसूर्य जोतिराव फुले आणि
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित
पुस्तके आणि दुर्मिळ ग्रंथ साहित्यांचे प्रदर्शनाची क्षणचित्रे**

करण्यात आले आहे. या जयंती सप्ताहाच्या पहिल्या दिवशी महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व त्यांच्यावरील लिहलेल्या दुर्मिळ पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जयंती सप्ताह कार्यक्रमाच्या निमंत्रिका प्रा. मनिषा करणे, ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. नंदकिशोर मोतेवार यांच्यासह विद्यापीठातील विविध प्राधिकरणातील सदस्य, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सात दिवस चालणारे हे प्रदर्शन शासकीय सुट्टी वगळून सर्वांसाठी खुले असून कार्यालयीन वेळेत इच्छुकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देण्याचे आवाहन मुंबई विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. सात दिवस चालणाऱ्या या संयुक्त जयंती सप्ताहामध्ये विविध कार्यक्रम, समुह चर्चा, कवी संमेलन, प्रश्न मंजूषा, चर्चासत्रे, अभिवादन, गीत गायन, नाटक आणि शाहिरी जलसा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

---

## मुंबई विद्यापीठात मिळेल आता दुहेरी पदवीचे शिक्षण
## अमेरिकेतील सेंट लुईस विद्यापीठासोबत शैक्षणिक सामंजस्य करार
## विद्यार्थ्यांना मिळेल दोन्ही विद्यापीठाची पदवी



**अमेरिकेतील प्रतिष्ठित सेंट लुईस विद्यापीठासोबत
शैक्षणिक सामंजस्य कराराची क्षणचित्रे**

मुंबई, दि. ०५ एप्रिलः राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने आघाडी घेत दुहेरी पदवीच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला आहे. याअनुषंगाने आता मुंबई विद्यापीठात विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचे शिक्षण मिळणार आहे. मुंबई विद्यापीठाने अमेरिकेतील प्रतिष्ठित सेंट लुईस विद्यापीठासोबत शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. या शैक्षणिक वर्षापासून माहिती तंत्रज्ञान विभागात एम.एस. इन डेटा एनालॅटिक्स या अभ्यासक्रमासाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण मुंबई विद्यापीठात तर द्वितीय वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण सेंट लुईस विद्यापीठात मिळणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना

कार्यांतर्गत प्रशिक्षण आणि इंटर्नशिपही करता येणार आहे. विशेष म्हणजे दुहेरी पदवी कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या या दुहेरी पदवीमुळे प्रत्येक संस्थेच्या सामर्थ्याचा आणि कौशल्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टता वृध्दीस हातभार लागणार आहे. आज मुंबई विद्यापीठ आणि सेंट लुईस विद्यापीठ यांच्यात युएएस वाणिज्य दुतावास या ठिकाणी या करारावर सह्या करण्यात आल्या. यावेळी मुंबई विद्यापीठाकडून कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा. शिवराम गर्जे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या विभागप्रमुख श्रीवरमंगई आणि सेंट लुईस विद्यापीठाकडून प्रोव्होस्ट मायकेल लेविस, प्रवेश व्यवस्थापन उपाध्यक्ष रॉबर्ट रेड्डी, सहयोगी डीन ट्रॉय हरग्रोव्ह, वरिष्ठ धोरणात्मक सल्लागार सुंदर कुमारसामी, ग्लोबल ग्रँड इनिशिएटिव्हच्या संचालिका अनुशिका जैन आणि अनन्या कुमार यांच्या समवेत मुंबईतील यूएस कॉन्सुलेटमधील कमर्शियल कॉन्सुल डेव्हिड पासक्विनी, जनरल सांस्कृतिक आणि शैक्षणिक विभाग प्रमुख सीटा रायटर, सार्वजनिक व्यवहार अधिकारी ब्रेंडा सोया आणि यूएस कमर्शियल सर्व्हिसच्या नोएला माँटेरो या उपस्थित होत्या.

मुंबई विद्यापीठाच्या माहिती आणि तंत्रज्ञान विभाग आणि सेंट लुईस विद्यापीठ या दोन्ही उच्च शिक्षण संस्थामध्ये झालेल्या कराराअंतर्गत विद्यार्थी विनिमयामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय वातावरणात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील डेटा एनालॅटिक्स, डिप लर्निंग, एनएलपी, मशिन लर्निंग, डेटा मायनिंग, डेटा एथिक्स अँड प्रायव्हसी, बिग डेटा एनालॅटिक्स आणि डेटाबेस मॅनेजमँट अशा विविध विषयातील अध्ययन, संशोधन पद्धती आणि उपकरणांचा अभ्यास करता येईल. या सहयोगाअंतर्गत दोन्ही विद्यापीठातील पायाभूत व अनुषंगिक सुविधा, कौशल्य आणि आधुनिक उपकरणे आणि संसाधनाच्या एकत्रित वापरामुळे अध्ययन व संशोधनातील संभाव्य परिणाम साध्य करता येऊ शकणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच एम.एस. इन डेटा एनालिटिक्स या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची व्याप्ती वाढवून पीएच.डी.साठीही सामायिक कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या करारामुळे उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने वाटचाल करताना माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत आणि अमेरिकेतील संशोधनाच्या प्राधान्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील जागतिक समज विस्तृत करण्यास मदत होईल तसेच विद्यार्थ्यांसाठी संधीचे नवे दालनही खुले होईल.

**दुहेरी पदवीचे फायदे:**

- विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळवण्याची संधी
- मुंबई विद्यापीठ आणि सेंट लुईस विद्यापीठाकडून मिळणाऱ्या दुहेरी पदवीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीची आंतरराष्ट्रीय ओळख वाढविण्यास मदत
- विद्यार्थ्यांना भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांतील वैविध्यपूर्ण शैक्षणिक वातावरण, अध्यापन पद्धती आणि संशोधन पद्धतींचा फायदा
- दोन वेगवेगळ्या देशांमध्ये राहणे आणि अभ्यास करण्यामुळे विद्यार्थ्यांना सांस्कृतिक जागरूकता,

अनुकूलता आणि भाषा कौशल्ये विकसित करण्यास मदत

- सांस्कृतिक आणि भाषा कौशल्ये वृद्धीस मदत
- दोन्ही संस्थांमधील अत्याधुनिक संशोधन सुविधा आणि प्रयोगशाळांच्या प्रवेशामुळे व्यावहारिक कौशल्ये आणि संशोधन क्षमता वाढीस चालना

## इटलीतील रोममध्ये आयोजित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापकांना आमंत्रण 'एकात्म मानव परिवार' विषयावरील आधारीत आंतरराष्ट्रीय परिषद

मुंबई, दि. ३० एप्रिलः इटलीतील रोममध्ये आयोजित होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापकांना आमंत्रीत करण्यात आले आहे. दि.२९ मे ते ४ जून २०२४ दरम्यान 'एकात्म मानव परिवार' या विषयावर आयोजित होत असलेल्या या परिषदेमध्ये मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका आणि हिंदू अध्ययन केंद्राच्या उप-संचालिका डॉ. माधवी नरसाळे, तत्त्वज्ञान विभागाच्या प्राध्यापिका व विभाग प्रमुख डॉ. प्रिया वैद्य आणि डॉ. मीनल कातर्णीकर, तसेच बहिशाल केंद्राच्या सहाय्यक प्राध्यपिका डॉ. प्राची मोघे यांना आमंत्रित करण्यात आले आहे. सदर चर्चासत्र रोम येथील 'फोकोलारे चळवळी' द्वारे आयोजित करण्यात येत आहे. फोकोलारे चळवळ आंतरधर्मीय सुसंवादाद्वारे सलोखा व सामंजस्य निर्माण करण्यासाठी कियारा लुबिक यांनी संस्थापित केली आहे. या परिषदेमध्ये जगासमोरील आव्हाने आणि अशांतता यांना तोंड कसे देता येईल ह्यावर विचार करण्यात येणार आहे.

## प्रा. बाळकृष्ण भोसले यांना इटलीतील प्रतिष्ठित विद्यापीठाकडून अभ्यागत प्राध्यापक म्हणून आमंत्रण

मुंबई, दि. २५ एप्रिल: मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. बाळकृष्ण भोसले यांना इटलीतील प्रतिष्ठित पॉलिटेक्निक यूनिवर्सिटी ऑफ मार्शीकडून अभ्यागत प्राध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. २० ते ३० मे २०२४ या दरम्यान पॉलिटेक्निक विद्यापीठाच्या अर्थशास्त्र आणि सामाजिक शास्त्र विभागामार्फत आयोजित केलेल्या सेमिनारमध्ये ते विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना मार्गदर्शन करतील. 'अँडरस्टंडिंग डेवलपमेंट इन इंडिया: बैलेंसिंग एक्स्पांसन अँड सस्टेनबिलीटी' आणि 'द लेबर मार्केट इन इंडिया अँड सोशिओ एनव्हायरनमेंटल सस्टेनबिलीटी' हे त्यांच्या व्याखानाचे विषय आहेत.

मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. बाळकृष्ण भोसले यांना अध्यापन आणि संशोधनाचा दीर्घ अनुभव आहे. सामाजिक शास्त्र अध्यापनाच्या क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम नियतकालिक आणि प्रकाशनांत त्यांचे मोठे योगदान आहे. विविध विषयांवरील लेख आणि पुस्तकांच्या माध्यमातून



मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे
प्रा. बाळकृष्ण भोसले

त्यांनी समाजशास्त्रातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकला आहे. प्रतिष्ठीत ऑक्सफोर्ड विद्यापीठातील सेड बिझनेस स्कूल मधून त्यांनी अकॅडेमिक लीडरशिप डेवलपमेंट प्रोग्रामही केला आहे.

प्रा. बाळकृष्ण भोसले यांनी यापूर्वी अल्केश दिनेश मोदी वित्तीय व व्यवस्थापन संस्थेचे प्रभारी संचालक, राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अध्ययन केंद्राचे प्रभारी संचालक म्हणून काम पाहिले आहे. प्रा. बाळकृष्ण भोसले यांना अभ्यागत प्राध्यापक म्हणून मिळालेल्या आमंत्रणाबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी प्रा. बाळकृष्ण भोसले यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---

## विद्यापीठाने केले विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण
## विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी विद्यार्थी संवाद

मुंबई, दि. १८ एप्रिल २०२४- मुंबई विद्यापीठात आज विद्यार्थी संवादाच्या माध्यमातून परीक्षेसंबंधीत नऊ विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे जलदगतीने निवारण करण्यात आले. निकाल, राखीव निकाल, पुनर्मूल्यांकन, गुणपत्रिका अनुषंगिक तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे यांनी आज या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सर्व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले.

आज उपस्थित ९ विद्यार्थ्यांनी निकाल, पुनर्मूल्यांकन, राखीव निकाल आणि गुणपत्रिका असे अनुषंगिक प्रश्न उपस्थित केले. या सर्व तक्रारींचे निवारण विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल राखीव होते अशा विद्यार्थ्यांना निकाल जाहीर झाल्याचे पत्र देण्यात आले, तर काही विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात आल्या.

मुंबई विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक बाबींशी निगडीत प्रश्न, शंका, समस्या यांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठात विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता पात्रता व नावनोंदणी, निकाल, गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र

यासह परीक्षा विभागाशी निगडीत प्रश्नांचे आणि तक्रारींचे प्राथम्याने निरसन करण्यासाठी महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी विद्यापीठात विद्यार्थी संवाद उपक्रमाचे आयोजन केले जाते. या उपक्रमातील पहिला विद्यार्थी संवाद दिनांक ३ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थित सर्व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले. उपस्थित १८ विद्यार्थ्यांनी छायांकित प्रत, निकाल, पुनर्मूल्यांकन, गुणपत्रिका, पात्रता, शिष्यवृत्ती आणि राखीव निकाल असे अनुषंगिक प्रश्न उपस्थित केले. या सर्व तक्रारींचे निवारण विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. अभियांत्रिकी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या छायांकित प्रतींबद्दल असलेल्या तांत्रिक समस्यांचे निराकरणही त्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या उपक्रमातील पुढील संवाद ४ मे आणि १५ मे २०२४ रोजी सकाळी ११ ते १२.३० वाजेदरम्यान मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील छत्रपती शिवाजी महाराज भवन (नवीन परीक्षा भवन) येथे करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांचे ओळखपत्र सोबत आणने अनिवार्य असेल. आज आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थी संवाद उपक्रमासाठी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

---

## ‘सेट’ परीक्षा ७ एप्रिल २०२४ रोजी मुंबईतील २८ केंद्रावरून १४, ४२६ विद्यार्थी देणार परीक्षा

मुंबई, दि. ०५ एप्रिलः सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची राज्यस्तरीय पात्रता परीक्षा अर्थात ‘सेट’ परीक्षा ही दिनांक ०७ एप्रिल २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने आणि मुंबई विद्यापीठाच्या समन्वयाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध २८ महाविद्यालयातील केंद्रावर ही परीक्षा पार पडणार आहे. या परीक्षेसाठी एकूण १४ हजार ४२६ एवढे परीक्षार्थी आहेत. या परीक्षेसाठीची प्रवेश पत्रे विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून दिली गेली आहेत. मुंबई विद्यापीठात आयोजित होत असलेल्या या परीक्षेच्या यशस्वी नियोजनासाठी मुंबई शहर केंद्र प्रमुख म्हणून इंग्रजी विभागातील प्राध्यापक डॉ. शिवाजी सरगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित मुंबई शहर आणि मुंबई उपनगरे जिल्ह्यातील एकूण २८ महाविद्यालयातील केंद्रावर ही परीक्षा सुरळीतरित्या पार पडण्यासाठी आवश्यक ते सर्व नियोजन करण्यात आले असून सर्व केंद्र प्रमुखांना योग्य त्या सूचनाही देण्यात आल्या असल्याचे प्राध्यापक डॉ. शिवाजी सरगर यांनी सांगितले. तसेच परीक्षार्थी यांची परीक्षेसंबंधीत कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी 9869028056 या क्रमांकावर संपर्क साधता येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# ३७ व्या आंतर विद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची उत्कृष्ट कामगिरी ७ सुवर्ण पदकांसह ४ रौप्य आणि २ कांस्य पदक

मुंबई, दि. ०२ एप्रिलः ३७ व्या आंतर विद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने उत्कृष्ट कामगिरी करत ७ सुवर्ण पदके, ४ रौप्य आणि २ कांस्य पदके जिंकली आहेत. या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने एकूण ८५ गुणांची कमाई केली आहे. भारतीय विद्यापीठे संघ (एआययु) यांच्या निर्देशानुसार २८ मार्च ते १ एप्रिल २०२४ या दरम्यान पंजाब ॲग्रिकल्चरल यूनिव्हर्सिटी, लुधियाना, पंजाब येथे या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात देशातील १३७ विद्यापीठे सहभागी झाली होती.

संगीत, नाट्य, नृत्य, साहित्य आणि ललितकला या पाच विभागात आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये मुंबई विद्यापीठाने संगीत विभागातून भारतीय शास्त्रीय

या स्पर्धांमध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले. तर भारतीय समुह गायन आणि पाश्चिमात्य वाद्यवृंद स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले आहे. नाट्य विभागातील एकांकीका स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले आहे. ललित कला विभागातील झालेल्या स्पर्धांमध्ये रांगोळी आणि चिकटचित्र स्पर्धेत सुवर्ण पदक, चित्रकला आणि मेहंदी स्पर्धेत रौप्य पदक तर छायाचित्रण आणि प्रतिष्ठापण स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या रॅली या प्रकारात विद्यापीठास सुवर्ण पदकाचा बहुमान मिळाला आहे.

हा राष्ट्रीय महोत्सव दोन फेऱ्यांमध्ये आयोजित केला जातो. स्पर्धेची प्राथमिक फेरी संपूर्ण देशात पाच क्षेत्रीय (पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि मध्य) विभागात




३७ व्या आंतर विद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची विजयी चमू


आयोजित केली जाते. या प्रत्येक क्षेत्रीय विभागातील प्रत्येक स्पर्धेच्या प्रथम, द्वीतीय आणि तृतीय पारितोषिक विजेत्यांना अंतिम फेरीत सहभागी होता येता येते. २२ ते २६ जानेवारी २०२४ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे आयोजित केलेल्या प्राथमिक फेरीमध्ये पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने १११ गुणांची कमाई करत अंतिम फेरीसाठी पात्र ठरत या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभाग घेतला. मुंबई विद्यापीठाच्या चमूने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांनी चमूचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे यशस्वी नियोजन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील आणि सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांनी केले.

---

## कथित बनावट गुणपत्रिकेबाबत मुंबई विद्यापीठाची पोलिसात तक्रार दाखल

मुंबई, दि. १९ एप्रिल : मुंबई विद्यापीठाची गुणपत्रिका १० ते १२ हजारात घरी बसून मिळेल अशी जाहिरात काही दिवसापूर्वी फेसबुक या समाज माध्यमावर आल्यावर पुणे येथील एका व्यक्तींनी ती जाहिरात पाहून, त्याने काही रक्कम दिल्यानंतर त्या व्यक्तीच्या व्हॉटसअॅप वर एक बनावट गुणपत्रिका मिळाली, अशाप्रकारची माहिती विद्यापीठास प्राप्त झाल्यावर याची विद्यापीठांनी गंभीर दखल घेऊन मुंबईतील बीकेसी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. याबाबत अधिक तपास बीकेसी पोलीस स्टेशन करीत आहे.

पुणे येथील एका व्यक्तींने फेसबुक या समाज माध्यमावर मुंबई विद्यापीठाची पदवी घरी बसून एका दिवसात १० ते १२ हजारात मिळेल अशी जाहिरात पाहिली त्याने त्या जाहिरातीतील फोनवर एका व्यक्तीशी संपर्क केला असता त्याने २००० रुपये ऍडव्हान्स मागितले, ऍडव्हान्स रक्कम भरल्यानंतर त्याच्या व्हॉटसअॅपवर मुंबई विद्यापीठाची बीएससीची एक कथित बनावट गुणपत्रिका प्राप्त झाली अशी माहिती मुंबई विद्यापीठास प्राप्त झाली. याची गंभीर दखल मुंबई विद्यापीठाने घेऊन पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.


University of Mumbai

GRADE CARD

CCF:0587:0016

Name : [redacted]

Examination : BSC.(SEM VI) (CBCGS)

Held In : APRIL 2023

Seat Number : 2060254 (PRN:2019016400981846)

| Course Code | Course Title | | Maximum Marks | Minimum Marks | Marks Obtained | Credits (C) | Grade | Grade Points (G) | C x G |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ZOOLOGY | | | | | | | | |
| USZO601 | TAXONOMY - CHORDATES AND TYPE STUDY | TH | 100 | 40 | 92 | 2.5 | O | 10 | 25.00 |
| USZO602 | PHYSIOLOGY AND TISSUE CULTURE | TH | 100 | 40 | 92 | 2.5 | O | 10 | 25.00 |
| USZOP07 | PRACTICAL OF USZO601 TO USZO602 | PR | 100 | 40 | 94 | 3 | O | 10 | 30.00 |
| USZO603 | GENETIC AND BIOINFORMATICS | TH | 100 | 40 | 85 | 2.5 | O | 10 | 25.00 |
| USZO604 | ENVIRONMENTAL BIOLOGY AND ZOOPHARMACOGNOSY | TH | 100 | 40 | 86 | 2.5 | O | 10 | 25.00 |
| USZOP08 | PRACTICAL OF USZO603 TO USZO604 | PR | 100 | 40 | 95 | 3 | O | 10 | 30.00 |
| | ECONOMIC ENTOMOLOGY | | | | | | | | |
| USACEENT601 | COMMERCIAL ENTOMOLOGY | TH | 100 | 40 | 84 | 2 | O | 10 | 20.00 |
| USACEENT6P1 | PRACTICAL OF USACEENT601 | PR | 100 | 40 | 91 | 2 | O | 10 | 20.00 |
| | GRAND TOTAL | | 800 | | 719 | 20 | | | 200.00 |

Sem. I CRED.: 20 SGPI: 9.00 Sem. II CRED.: 20 SGPI: 9.10 Sem. III CRED.: 20 SGPI: 9.50
Sem. IV CRED.: 20 SGPI: 9.05 Sem. V CRED.: 20 SGPI: 9.78 Sem. VI CRED.: 20 SGPI: 10.00

Remark : SUCCESSFUL CGPI : 9.41

Result Declared On : JUNE 10, 2023

DIRECTOR
BOARD OF EXAMINATIONS AND EVALUATION

P.T.O.

680477

विद्यापीठाने केलेल्या या पोलीस तक्रारीत सदर प्रकारची बाब समाजाची दिशाभूल व आर्थिक फसवणूक

करणारी असून मुंबई विद्यापीठाची प्रतिमा मलिन करणारी आहे. तरी या प्रकरणाशी संबंधित असणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, जेणेकरून वरील प्रकारच्या बाबींना आळा बसण्यास मदत होईल अशा आशयाची लेखी तक्रार केली आहे.

अशाप्रकारच्या कोणत्याही फसव्या जाहिरातीला विद्यार्थ्यांनी बळी पडू नये. ही पदवी किंवा गुणपत्रिका बनावट आहे. फोटोशॉप किंवा इतर साधनाचा वापर करून बनावट गुणपत्रिका किंवा पदवी बनविली आहे. या सोबत ज्या व्यक्तींनी गुणपत्रिका घेतली आहे. तीच बनावट आहे. एप्रिल २०२३ ची बीएससी सत्र ६ ची कथित गुणपत्रिका असून त्यावर स्वाक्षरी मात्र यापूर्वीच्या जुन्या परीक्षा संचालकांची आहे. यामुळेच अशा बनावट गुणपत्रिका व पदवी देणाऱ्यापासून सावध रहावे असे आवाहन मुंबई विद्यापीठाने केले आहे.

## मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुधीर पुराणिक यांचे निधन



मुंबई, दि.०३ एप्रिल २०२४- मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव सुधीर पुराणिक यांचे आज दिनांक ०३ एप्रिल २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी प्रा. अंजली पुराणिक आणि दोन मुले आहेत.

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून सुधीर पुराणिक यांनी १३ ऑक्टोबर २०२१ रोजी पदभार स्विकारला होता. मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे प्रभारी संचालक म्हणून सुधीर पुराणिक यांनी भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठामार्फत अनेक समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यात आले होते. कोव्हीड-१९ च्या काळात गरजवंतांना मदतकार्ये, कम्युनीटी किचन, रक्तदान शिबिरे, पुरग्रस्तांना मदत अशी विविध उपक्रम त्यांनी यशस्वीरित्या राबवली आहेत. त्यांच्या निस्वार्थ सेवेचा यथोचित गौरव म्हणून राज्य शासनाचा सन २०२१-२२ या वर्षासाठीचा 'सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक' म्हणून त्यांना पुरस्कार जाहिर करण्यात आला.

सुधीर पुराणिक हे पाली येथील शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. २००५ पासून ते उपप्राचार्य म्हणूनही महाविद्यालयात कार्यरत होते. महाविद्यालयात नॅक स्टीअरिंग समितीचेही त्यांनी काम पाहिले आहे. सुधीर पुराणिक यांनी २००४ ते २०१४ पर्यंत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी ते २०११ ते २०१४ पर्यंत जिल्हा समन्वयक म्हणून त्यांनी उत्तमरित्या काम केले आहे.

त्यांच्या निधनाबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि समस्त शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शोक व्यक्त केला.

निर्मिती आणि संपादन:
**जनसंपर्क विभाग**
मुंबई विद्यापीठ

पत्ता:
**मुंबई विद्यापीठ**
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००३२

प्रकाशक:
**प्रा. बळीराम गायकवाड**
कुलसचिव

info@mu.ac.in www.mu.ac.in @Uni_Mumbai